Impact Factor-8.632 (SJIF)
ISSN-2278-9308
ISSUE NO.
(CDLXXV) 475


# B.Aadhar

Single Blind Peer-Reviewed & Refereed Indexed

Multidisciplinary International Research Journal

March-2024

## MAHATMA BASAVESHWAR : DEMOCRACY AND MODERNITY



Chief Editor
Prof. Virag S. Gawande
Director
A. S. R. & D. Training Institute Amravati

Executive Editor
Dr. Reeta Dhandekar
Professor & HoD, Political Science
Sevadal Mahila Mahavidyalaya, Nagpur.

Co-Editor
Shri. Vijay Pandhare
Dept. of Political Science
Dr. M.K.Umathe College, Nagpur

Executive Editor
Dr. Sharad Sambare
Associate Professor & HoD, Political Science
Yashoda Girl's Arts & Commerce College, Nagpur.

This Journal is indexed in :

- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmos Impact Factor (CIF)
- International Impact Factor Services (IIFS)

For Details Visit To : www.aadharsocial.com

Aadhar Publications

B.Aadhar' Peer-Reviewed & Refereed Indexed Multidisciplinary International Research Journal
Impact Factor -(SJIF) -8.632, Issue NO, (CDLXXV) 475
ISSN : 2278-9308
March 2024


| | | |
|---|---|---|
| 20 | कुशल संघटक आणि महाव्यवस्थापक महात्मा बसवेश्वर डॉ. सचितानंद शं. बिचेवार | 70 |
| 21 | महात्मा बसेश्वर यांचे लोकशाही संबंधी विचार प्रा. सुरेश जे.भालेराव | 74 |
| 22 | महात्मा बसवेश्वर आणि भारतीय तत्त्वज्ञ विचारक, विशेष संदर्भ - गौतम बुद्ध, महावीर, संत कबीर, महात्मा गांधी आणि शाहू महाराज डॉ. चैतन्य शंकर कांबळे | 76 |
| 23 | महात्मा बसवेश्वर यांचा समता विषयक विचार प्रा. विराज महाजन | 80 |
| 24 | संत बसवेश्वर महाराज एक थोर समाजसुधारक डॉ. नितीन तुळशीराम कन्नोजवार | 83 |
| 25 | महात्मा बसवेश्वर आणि सामाजिक परिवर्तनाची चळवळ राहुल नरंगलकर | 86 |
| 26 | वर्तमान काळात बसवेश्वरांच्या विचाराची प्रासंगिकता श्री. कमलाकर सदानंद राऊत | 91 |
| 27 | स्त्रीमुक्तीचे आद्य प्रणेते : महात्मा बसवेश्वर श्री मुनेश्वर ता. जमइवार | 95 |
| 28 | आधुनिकतेचे अग्रदूत - महात्मा बसवेश्वर संदीप भारतराव कदम | 98 |
| 29 | समतेचे पुरस्कर्ते महात्मा बसवेश्वर डॉ. एन आर चिमुरकर | 101 |
| 30 | महात्मा बसवेश्वरांची राजकीय परिवर्तनाची दिशा प्रा. सुधीर वानुवाकोडे | 104 |
| 31 | महात्मा बसवेश्वर आणि लिंगायत आंदोलन डॉ.गणेश बंडूजी माघाडे | 109 |
| 32 | महात्मा बसवेश्वरांची 'कायक' संकल्पना एकनाथ आर. मुरकुटे | 112 |
| 33 | महात्मा बसवेश्वर आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा मानवधिकार शुभम सु.सोनोने | 115 |
| 34 | 'महात्मा बसवेश्वर: आधुनिक विचारांचा एक द्रष्टा महानायक' डॉ. नरेंद्र व रघटाटे | 118 |
| 35 | बसवेश्वराचा वीरशैव धर्म आणि बौद्ध धर्माचा प्रभाव नारायण थोरात | 125 |
| 36 | अनुभव मंटप लोकशाहीची संसद डॉ. रामचंद्र हरीभाऊ बुटले | 130 |
| 37 | महात्मा ज्योतीबा फुले-सावित्रीबाई फुले व महात्मा बसवेश्वर यांचे स्त्री-पुरुष समानतेविषयी विचार : एक तुलनात्मक अध्ययन अश्विनी कुहिटे, अनिल सी. वनकर | 132 |
| 38 | महात्मा बसवेश्वर आणि स्त्री पुरुष समानता कु. स्मिता धनिराम टेभुर्णे | 135 |
| 39 | भारतातील सामाजीक, आर्थिक, राजकीय प्रश्न आणि बसवेश्वर श्री. बापु प्रल्हाद राठोड, डॉ. अमर बोंदरे | 139 |
| 40 | महात्मा बसेवेश्वर : सामाजिक न्याय आणि सामाजिक लोकशाही प्रा. कृष्णा मेश्राम | 142 |
| 41 | महात्मा बसवेश्वरांचा सामाजिक कार्यांची समकालीन प्रस्तुतता डॉ. शरद सांबारे , विजयकुमार ग्यानचंद पंधरे | 146 |

**B.Aadhar'** Peer-Reviewed & Refereed Indexed Multidisciplinary International Research Journal

Impact Factor -(SJIF) -8.632, Issue NO, (CDLXXV) 475

ISSN : 2278-9308
March 2024

# भारतातील सामाजीक, आर्थिक, राजकीय प्रश्न आणि बसवेश्वर

श्री. बाबु प्रल्हाद राठोड

संशोधन विद्यार्थी

डॉ. अमर बोंदरे

राज्यशास्त्र विभाग, व्हि.एम.व्ही. कॉलेज नागपूर

प्रदीर्घ कालखंडाच्या गुलामीतून भारताला 15 ऑगस्ट 1947 ला स्वांतत्र मिळाला. ब्रिटिश कालखंडापासुन भारतात मोठया प्रमाणात आर्थिक, सामाजीक, व राजकीय बदल घडुन आले होते. परंतु स्वांतत्र्या नंतर संविधानीक चैकटीमार्फत सामाजीक आर्थिक, राजकीय प्रश्नांना सोडवणूक करण्यात आली. भारतीय संविधानात लोकाना स्वांतत्र, समता, बंधुता, स्त्री-पुरुष समानता, सामाजीक न्याय,आर्थिक न्याय अशा गोष्टी अंतर्भूत करण्यात आल्या तरी आज 75 व्या वर्षाच्या स्वांतत्र्यानंतर भारतीय समाजात अशा प्रश्नांना समोर जावे लागत आले. त्याच प्रमाणे वरील प्रश्नाची सोडवणूक बसावेश्वराच्या विचारांतून घेता येते. सामाजीक, आर्थिक, राजकीय प्रश्न खुप गुंतागुंतीचे व आव्हानात्मक आहेत. अशा प्रश्नांना दुर करण्यासाठी दिव्यवलयी व्यक्तीमत्वाला अपेष्टा, हाल, अपमान सहन करावे लागतात याची कल्पना सर्वसामान्य माणूस करु शकणार नाही समाजाच्या देखील एक विचारांच्या विघापीठ असतो. त्या विद्यापीठात आपल्या कर्तृत्वावर मध्ययुगीन काळात स्वांतत्र अस्तित्व निमार्ण करणारे महामानव म्हणजे महात्मा बसवेश्वर होते. मध्ययुगीन काळ हा अंधश्रध्देचा भरभराटीचा काळ होता त्यामुळे समाजात बहुजनांचे शोषण होत होता. चूकीच्या प्रथा वेगानी समाजात रुढ होत होत्या अशावेळी पथदर्शकाचे काम महात्मा बसवेष्वरांनी आपल्या विचार व आचाराव्दारे केली. घरावर तुळशीपत्र ठेवुन समाजाचा रोप पत्करुन महात्मा बसवेश्वरा बरोबरच इतरही शरण - शरणीनी अहर्निश समाज सुधारणेचे काम केले.

भारतीय समाज वैदिक कालखंडानंतर वर्णव्यवस्था, जातीव्यवस्था आणि वैदिक कर्मकांड अशा प्रतिकावर शासन करत असल्याने समाजात विशमता तयार झाली महात्मा बसवेश्वरांनी समाजातील आर्थिक विषमता जवळुन अनुभवली होती. भारतीय समाजात श्रीमंत आणि गरीब यांची मोठी दरी होती. त्याचप्रमाणे बेकारी बेरोजगारी दारिद्र गरीबी उच्च-निच्चता लोंकाची दैववादी प्रवृती अंधश्रंध्दा अशा अनेक समस्या होत्या. बाराव्या शतकात जागतीक स्तरावर पुरोगामी विचारांची कमतरता होती जणु काही विचारसरणीचे युगाचां अंत झाला होता संपुर्ण जगात देववाद व धर्मशास्त्राच्या अंधकारातून बुडाले होते. मानवाची जीवणशैली धर्मसंस्थेतून संचारीत होत होती बसव काळातील राजकारण, धर्म , वर्ग , वर्णहित , सामाजीक अन्यायकारी साधनसामूग्रीचे केंद्रींकरण करण्याचा तत्वावर बराचपैकी आधारीत असल्याने जाणवते तरी राजकारण समाजकारण अर्थकारण व मानवी कल्याणाचे विचार प्रांसगिक होते. बसव काळामध्ये धार्मिक हक्क सत्ता संपत्ती दर्जा व माणूस प्रतिश्ठा ज्या समाज घटकांना नाकारली जाते व ज्यांना देवधर्म मोक्ष स्वर्ग नरक पाप - पुण्य इत्यादीच्या बळावर दडपले जाते ते गुलामीना वागलेले वर्ण समानतेच्या आक्रोश करीत संघर्श उभे करतात व प्रचलीत व्यवस्था दवळून काढतात. अशाप्रकारे बसवेष्वरांनी बाराव्या शतकात सामाजीक आणि आर्थिक प्रष्नांना हात घालून प्रबोधन व जाग्रती करण्याचे कार्य केले. बसवेश्वरांनी आर्थिक प्रष्नांविशयी विचार पाहता त्यांनी तत्कालीन व आजच्याही भारतीय समाजातील धार्मिक शोशण, पुरोहितशाही, सरंमजामशाही व्यवस्था, श्रीमंत- गरीब वसाहतवादी, भांडवलशाही यांच्यातील अंतविरोधाचे भान असल्याने जाणवते पण हे मांडताना समाजातील प्रस्थापित वर्ग तत्काळात विवेकपुन्य होउुन संघर्श करणार नाही यांही गोश्टीचा उहापोह असल्याने जाणवते. आजच्या तंत्रज्ञान युगात मानवी जीवणशैली आरामदायी व आळपीचा प्रवृतीवर आधारीत आहे त्यामुळे समाजात बेरोजगारी व उत्पादन प्रक्रियेवर वाईट परिणाम झालेला दिसून येते. बसव काळामध्ये सुध्दा

सामाजीक विशमता असल्याने उच्चवर्णीय समाज घटकात ऐशोआराम जीवनशैली प्रवृत असल्याने बसवेश्वरांनी उच्चवर्णीयांच्या विरोध करुन सर्वांनीच श्रम करुन उत्पादन वाढीला हातभार लावावा असा कायक व कैलास हा सिंध्दात मांडला.

मध्ययुगीन कालखंडात धर्मशास्त्राव्दारे स्त्रीयांना हक्कांना गौणत्वाचे स्थान होते. स्त्रीयांना संपत्ती, मानवी प्रतिश्ठा, संधीची समानता, सामाजीक दर्जा असे हक्क नाकारले जात होते. आधुनिक कालखंडात आपल्या देशात संविधानामार्फत असे हक्क दिलेले आहेत तरी सुध्दा ते फक्त कागदोपत्री आहेत. आजही महिला हक्क, पितृसत्ताक व्यवस्थेच्या अधिपत्याखाली दाबले जातात. ज्याप्रमाणे बसवेश्वरांनी बाराव्या शतकात स्त्री-पुरुश समानतेला पुरजोर केला होता. तीच गरज या सामाजीक प्रश्नांला आधुनिक कालखंडामध्ये सूध्दा आहे. मध्ययुगीन कालखंडात व्यवसाय हे जन्माच्या वर्णव्यस्थेवर आधारीत केली जात होती त्यामुळे कोणत्याही व्यक्तीतील गुणवत्ता,उपक्रमशिलता, सृजनपिलता यावर बाधा येत असे. या प्रश्नावर बसवेश्वरांनी स्वांतत्र व समता या तत्वांवर भर देवुन समाजात उपक्रमशिलतेला वाव दिलीत्र आधुनिक कालखंडात भारतीय समाजात जात हा घटक अजूनही महत्वाचा भाग आहे. दलित घटकातील व्यक्तीवर मुलभूत सुविधेपासून वगळले जात आहे. अशा या भारतीय समाजात बसवेश्वरांचा विचारांची प्रांसगीकता भेडसावत आहे. ज्याप्रमाणे बसवकाळात जातीय व्यवस्थेच्या वर्चस्ववाने वर्यात्र लोंकाना उच्च - निम्नता व राजकीय हक्कापासून वगळले जात होते. तीच परिस्थिती भारतीय लोकशाहीत सत्ताप्राप्तीमध्ये धनिक व आर्थिक प्रभळ लोंकाकडे केंद्रिकृत झाली आहे. शासनयंत्रनेकडे वर्चस्ववादी व धनिक लोंकाचा प्रगडा बसवेश्वरांचा विचारातुन दिसून येतो या राजकीय प्रश्नांना बसवेश्वरांच्या विचारांतुन मुक्तता मिळवण्यासाठी मार्ग मिळते. कोणत्याही समाजाचा सर्वांगीण विकास घडवून आणयचा असेल तर त्या समाजाची मानसीक धारणा विवेकनिश्ठ असावी लागते. विवेकनिश्ठ मानसीक धारणा तयार होण्यासाठी सातत्याने प्रयत्न करावे लागते. विशेपता धर्ममार्तंडांना लादलेली मानसीक गुलामीतून मूक्त व्हावे लागते. सर्वसामान्य समाजाच्या मनात देव -धर्माच्या नावाखाली निमार्ण केलेली भयग्रस्तता संपृष्ठातआणावी लागते. पंरपरागत अनिष्ठ रुढी पंरपंरा कथित धर्मग्रंथाचे अधांनुसरण व्यर्थ कुलाभिमान अधंश्रध्दा यांचा त्याग करुन विवेकी विचार स्वीकारण्याचे धाडस समाजमनात निमार्ण करावे लागते. महात्मा बसवेश्वरांनी असा यशस्वी प्रयत्न केला. धर्माच्या बुरख्या आडुन अनेक अंध्दश्रध्दा पसरावुन मानसीक गुलामी लादणारी व्यवस्था बदलण्यासाठी त्यांनी संघर्श केला तसेच नवी पर्यायी अपी विवेकनिश्ठ व्यवस्था निमार्ण केलेली. स्वातंत्रानंतर सध्यकाळात हिंदुत्ववादी संस्कृती प्रबळ करण्याचा प्रयत्न चाचला आहे. त्यामुळे ख्रिश्चन व मुसलमान लोंकानी संर्घश वाढत चालला आहे. भारतीयाच्याएकात्मतेच्या दृष्टीने हे योग्य नव्हे दृ सर्वांना मिळून मिसळून वागण्यातच सर्वांचे हीत आहे एकमेकावर कुरघोडी करण्याचा प्रयत्न चाललेला आहे तो निश्चितच भारतीयाच्या एकीला मारक ठरणार आहे. स्वांतत्र समता बधुता सामाजीक न्याय लोकशाही व वैज्ञानिक दृष्टीकोण रुजवुण राष्ट्रीय एकात्मतेला निर्माण करावी स्त्री ज्याच्यातून मुक्त व्हावी, तिलाही सन्मानाने जगता यावे याच बरोबर समाजातील दारिद्र विशमता अंधश्रध्दा गुलामगिरी अस्पृश्यता जातीयता मुळासकट उपसवुन काढण्यासाठी निस्वार्थपणे बसवेश्वारांनी हा लढा बाराव्या शतकात उभा केला होता.

सद्यस्थितीत भश्टाचार चंगळवाद धावपळ यंत्रयुग दहशतवाद अमानवीयकृत्य गटबाजी धार्मीकता जातीवाद पंरपरावादी रुढीवाद पाहिल्यानंतर बसवेश्वरांच्या सामाजीक लढयाचे नेतृत्व कोणीतरी पुढाकार घेवुन उभे करावे असे वाटते. परीवर्तनवादी विचारांचे स्वतःला महामानवाचे पाईक समजून घेणा-या अनुयायाच्या कृमी उक्तीस साम्य दिसत नाही. स्वतःकडुन नव्हे तर इतराकडुन चांगल्या वर्तनाची अपेक्षा प्रत्येकाची वाढत आहे. आज सगळीकडे अन्याय , अत्याचार , दैववाद , अपांतता, तिमरे महायुध्द दिसत आहे. तेव्हा बसवेश्वराचे विचार तारु शकतील यात शंका कदापी नाही. आज देशात विचारंवत व समाजसुधारकांची यादी खुप मोठी आहे समाजाची सूधारणा फारशी झालेली नाही याला लढयाचे नेतृत्व करण्याचा स्वार्थ, चैनीवृती, अंहकार , अरेरावीपणा व लालसा कारणीभुत आहे. त्यामुळे सामाजीक आर्थिक व राजकीय प्रश्नांचीसोडवणुक फक्त कागदावरच होत आहे प्रत्यक्षात मात्र अस्वस्थ करुन सोडवणारी आहे एंकदरीत महात्मा बसवेश्वराच्या सामाजीक आर्थिक व राजकीय कृतीशील लढा बुध्दीप्रामाण्यवादाचा व्यक्तीस्वांतत्र्याचा अर्थातच मानवमुक्तीचा होता. हातात

शस्त्र घेउन नव्हे तर विचार व प्रेम घेऊन महात्मा बसवेश्वर लढत होते. बसवेश्वराच्या सामाजीक आर्थिक व राजकीय प्रश्नाची सोडवणुक भावणेवर नाही तर विचार व कृतीवर उभी होती. वरील प्रश्नांना वैचारिक पाया असल्यामुळे आजही महात्मा बसवेश्वरांचे विचार अजर, अमर व अक्षर आहे व पुढेही राहतील.

1 लिगांयत - लिगवंत आणि वीरशैव एक चिकित्सा- राजू ब. जुवरे माहे सप्टेंबर 2021 अंक 2
2. पिवयोग: जनतांत्रीक वैशिक साधना – शिवदास लखदिवे
3. निरामय समाज आणि बसवतत्व - प्रा. राजशेखर म. करडीगुददी मे-जून 2020
4. क्रांतीकारी दार्शनिक म. बसवण्णा- प्रो. मालचंद्र जमशेटटी जाने- फेब्रुवारी 2023